# श्रीगुरुस्तुति (गुरुवार)

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा। जो नित्य राहे उदितप्रभात्मा॥
ज्ञाने जयाच्या नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ १॥
अखंड आत्मा अविनाशी दत्त। तया पदी लाविती जे स्वचित्त
वित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ २॥
जो जागृतिस्वप्नसुषुप्तिसाक्षी। जो निर्विकारे सकलां निरीक्षी।
वीक्षी परी ज्यासी नसे निजार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ ३॥
जळीं स्थळी सर्वही वस्तुमाजीं। व्यापूनी राहेचि तयासि राजी।
जो ठेवि भावें नर हो कृतार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ ४॥
जें दृश्य तें रूप नसे जयाचे। दृश्यांत राहे अविकारी ज्याचे।
स्वरूप तोची अविनाशी अर्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ ५॥
दृश्यासि घेतां नच घेववें जें। स्वरूप तत्स्थ प्रभुचें स्वतेजें॥
स्वयें प्रकाशे जगि जो परार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ ६॥
असोनी सर्वत्र गुरुप्रसादा। विना न लाभें करताही खेदा॥
भेदाची वार्ता करी जो अपार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ ७॥
अनन्यभावें भजतां अनन्य। लभ्य प्रभू जो नच होयि अन्य॥
सन्यस्त सर्वेषण तारणार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ॥ ८॥
मागे तुकाराम तयासि दत्त। दे वासुदेवा करूनी निमित्त॥
हें स्तोत्र चिन्मात्र पदासमर्थ। द्याया हराया सकलाध्यनर्थ॥ ९॥
गाणगापुरी अठराशें सत्तावीस शकामधीं।
उदेले स्तोत्र हे आधिव्याधि हारि हरी कुधी॥ १०॥

॥ इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती
विरचितं गुरुस्तुतिः संपूर्णम॥